मा. विशेष न्यायाधीश विशेष न्यायालय, कोल्हापूर

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** कोडोली **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0177 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/11/2019 03:05 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 28/11/2019

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/11/2019

**Time From (वेळेपासून):** 16:28 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 29/11/2019 **Time (वेळ):** 02:32 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 005 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/11/2019 02:32 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** MSEB शाखा कार्यालय , कोडोली,पन्हाळा,

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.दिपक रामचंद्र पाटील

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | तळसंदे,हातकणंगले,कोडोली,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | तळसंदे,हातकणंगले,कोडोली,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेश अनिल घुले | | वडील का नाम : अनिल घुले | 1. 86-अ/2/5,,आसरा निवास,लाटवडे रोड बीवायकालेज जवळ,पेठ वडगांव,, हातकणंगले,कोडोली,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5,000/ | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 5,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी दिपक रामचंद्र पाटील, वय 37, व्यवसाय - इलेक्ट्रीक कान्ट्रक्टर, रा. मु.पो. तळसंदे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, मो.नं. 8668553267 आज रोजी समक्ष फिर्याद देतो की,मी वरील पत्यावर सहकुंटुब राहण्यास आहे. माझे कोडोली, ता.पन्हाळा येथे इलेक्ट्रीक षाप असून मी इलेक्ट्रीक कान्ट्रक्टर आहे. कोडोली गावातील गट नंबर- 1074/बी येथील राधाकृष्ण अपार्टमेंट मधील एकुण 14 फलट धारकांचे नविन वीज जोडणीचे काम माझेकडे आहे. त्या कामानिमीत्य मी एम.एस.ई.बी. षाखा कार्यालय (कोडोली अर्बन) कोडोली, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे अर्ज दिलेला आहे. परंतू त्याप्रमाणे फलट धारकांचे नविन वीज (मीटर) जोडणी केली नसल्याने मी दिनांक 26/11/2019 रोजी एम.एस.ई.बी. षाखा कार्यालय (कोडोली अर्बन) कोडोली येथील सहायक अभियंता घुले यांची भेट घेवून राधाकृष्ण अपार्टमेंट मधील 14 फलट धारकांचे नविन वीज (मीटर) जोडणीबाबत चर्चा केली. त्यावेळी सहायक अभियंता घुले यांनी मला राधाकृष्ण अपार्टमेंट मधील 14 फलट धारकांचे नविन वीज (मीटर) जोडणी करणेकरीता प्रत्येक फलट धारकांचे 2000/- रुपये प्रमाणे द्यावे लागतील, तरच मी सर्व फलट धारकांचे नविन वीज (मीटर) जोडणी करुन देईन, नाहीतर देणार नाही असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना प्रत्येकी 2000/- रुपये काही जमणार नाही असे सांगितलेवर सहायक अभियंता घुले यांनी मला सर्वांचे मिळून 5000/- रुपये द्या,मगच मी सर्व फलट धारकांचे नविन वीज (मीटर) जोडणी करुन देतो असे सांगितले. मी त्याचेविरूध्द कारवाई होणेसाठी दि. 26/11/2019 रोजी अन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे समक्ष हजर राहुन लेखी तक्रार दिली. त्यावेळी पोलीस निरीक्षक जितेंद्र पाटील यांनी दि. 27/11/2019 रोजी सकाळी 11.00 वा कोडोली गावातील श्री. अंबाबाई मंदीरसमोर येण्याबाबत सांगुन, गोपणीयतेच्या सुचना देवुन घरी पाठविले.दि. 27/11/2019 रोजी पोनि पाटील यांनी माझेशी संपर्क साधुन मला श्री. अंबाबाई मंदीरचे समोर रोडवर पांढरे स्वीफ्ट कारने येत असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे शोडया वेळानंतर मी तेथे माझे शेवरोलेट कार नं. एम एच 02 सी एल 7881 ने जावुन त्यांना भेटलो. त्यावेळी पोनि पाटील यांनी त्यांचे कारमध्ये बोलवुन घेतले. त्यानंतर माझी व सापळा कारवाईचे अनुषंगाने उपलब्ध करून घेतलेल्या दोन्ही शासकीय पंच व सापळा पथकातीत कर्मचारी यांची आपसात ओळख करून दिली व माझी ओळख सांगितली. तसेच त्यांनी मला थोडक्यात माझी तक्रार दोन्ही पंचांना सांगणेस सांगितली. त्याप्रमाणे मी माझी तक्रार सांगितले नंतर, पोनि पाटील यांनी मी दि. 26/11/2019◌ रोजी त्यांना दिलेला तक्रारी अर्ज पंचांना वाचणेस दिला. तो अर्ज वाचुन पोनि पाटील व दोन्ही पंचांनी त्यावर सह्या केल्या. त्यानंतर पोनि पाटील यांनी मला माझे तक्रारीचे अनुषंगाने एम.एस.ई.बी. शाखा कार्यालय कोडोली अर्बन येथे पंच नं. 1 तोडकर यांचेसोबत माझे शेवरोलेट कारमधुन पाठवुन देवुन सहाय्यक अभियंता घुले हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची प्रथम

पडताळणी करणार असलेचे सांगितले. मला पंचासमक्ष डिजीटल रेकार्डर चालु-बंद करणेचे प्रात्यक्षिक दाखविले व मला ते समजलेची खात्री केली. तसेच रेकार्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड घालुन त्यामध्ये कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत झालेले नसलेची पंचांची खा्त्री करून दिली. त्यानंतर पोनि पाटील यांनी मला व पंच नं. 1 तोडकर यांना पडताळणी कारवाईबाबतच्या सुचना दिल्या व त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर माझे गळ्यामध्ये अडकविला. तसेच रेकार्डर चालु करून माझेसोबत पंच नं. 1 तोडकर यांना सहाय्यक अभियंता घुले यांची भेट घेण्यासाठी माझे शेवरोलेट कारमधुन एम.एस.ई.बी. चे कोडोली अर्बन शाखा कार्यालयाकडे पाठविले. तेथे गेलेवर मी सहाय्यक अभियंता घुले यांना भेटुन माझे कामाबाबत चर्चा केली, पण त्यांचे अधिकारी तेथे येणार असल्याने व समोर खुप लोक असल्याने घुले यांनी जास्त बोलणे टाळले. त्यामुळे मी बाहेर जावुन त्यांना फोन करून बाहेर येवुन भेटण्याची विनंती केली, पण ते बाहेर आले नाहीत. म्हणुन मी त्यांना भेटुन सांगितले की, मी 05.00 वा चे नंतर येवुन भेटतो. त्यानंतर मी व पंच नं. 1 तोडकर असे माझे कारने पोनि पाटील व त्यांचा स्टाफ थांबले ठिकाणी अंबाबाई मंदीरजवळ परत आलो. पोनि पाटील यांनी मला त्यांचे कारमध्ये बोलवुन घेेेेवुन माझे गळ्यातील डिजीटल व्हाईस रेकार्डर बंद करून आपले ताब्यात घेतला.त्यानंतर पोनि पाटील यांनी मला गाडीचे बाहेर थांबणेस सांगुन पंच तोडकर यांना गाडीमध्ये बोलवुन घेवुन त्यांचेकडे विचारपुस केली. त्यानंतर पंच तोडकर यांना बाहेर पाठवुन मला गाडीमध्ये बोलवुन घेवुन माझेकडे घडलेल्या घटनेबाबत विचारपुस केली. त्यावेळी मी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि पाटील यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर सुरू करून त्यामध्ये ध्वनीमुद्रीत झालेले माझे व सहाय्यक अभियंता घुले यांचे संभाषण ऐकले. त्यावेळी माझे व पंच नं. 1 तोडकर यांचे सांगणेवरून, तसेच डिजीटल व्हाईस रेकार्डर मधील ध्वनिमुद्रीत संभाषणावरून मी सहाय्यक अभियंता घुले यांना 05.00 वा चे नंतर त्यांचे कार्यालयात येवुन भेटतो असे सांगितलेचे निष्पन्न झाले. त्यामुळे सायंकाळी 05.00 वा परत पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर मला सायंकाळी 04.30 वा परत श्री. अंबाबाई मंदीरसमोर रोडवर येवुन भेटण्यास सांगुन पोनि पाटील, दोन्ही पंच व स्टाफ असे त्यांचे कारने तेथुन निघुन गेले होते.त्यादरम्यान सहाय्यक अभियंता घुले यांनी माझे अर्जाप्रमाणे राधाकृष्ण अपार्टमेंट मधील 14 फ्लट धारकांचे नवीन वीज जोडणीचे काम करून दिले होते. 04.00 वा चे सुमारास पोनि पाटील यांनी मला ठरल्याप्रमाणे येवुन भेटणेस सांगितले. त्याप्रमाणे मी तेथे जावुन त्यांना भेटलो, तेव्हा त्यांनी मला त्यांचे कारमध्ये बोलवुन घेतले. त्यावेळी त्यांना दरम्यान कालावधीत नवीन वीज जोडणीचे काम सहाय्यक अभियंता घुले यांनी पुर्ण केले असल्याचे सांगितले. त्यावेळी पोनि पाटील यांनी मला माझे तक्रारीचे अनुषंगाने एम.एस.ई.बी. शाखा कार्यालय कोडोली अर्बन येथे पंच नं. 1 तोडकर यांचेसोबत माझे शेवरोलेट कारमधुन पाठवुन देवुन सहाय्यक अभियंता घुले हे माझेकडे नवीन वीज जोडणीचे काम करून दिलेबद्दल बक्षीस म्हणुन लाचेची मागणी करतात अगर कसे? याची प्रथम पडताळणी करणार असलेचे सांगितले. त्यानंतर पोनि पाटील यांनी मला व पंच नं. 1 तोडकर यांना पडताळणी कारवाईबाबतच्या सुचना दिल्या व त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर माझे गळ्यामध्ये अडकविला. तसेच रेकार्डर चालु करून माझेसोबत पंच नं. 1 तोडकर यांना सहाय्यक अभियंता घुले यांची भेट घेण्यासाठी माझे शेवरोलेट कारमधुन परत एम.एस.ई.बी. चे कोडोली अर्बन शाखा कार्यालयाकडे पाठविले. तेथे मी पंचासह कार्यालयात गेल्यावर त्यांचेत व माझेत माझे काम पुर्ण झालेबाबत चर्चा झाली. चर्चेदरम्यान सहाय्यक अभियंता घुले यांनी नवीन वीज जोडणीचे केले कामासाठी बक्षीस म्हणुन माझेकडे 5,000/- रू. लाचेची मागणी करून लाच रक्कम उद्या-परवा, कधी पण देणेस सांगितलेवर मी व पंच तोडकर असे माझे कारमधुन पोनि पाटील व त्यांचा स्टाफ थांबले ठिकाणी अंबाबाई मंदीरजवळ परत आलो. त्यावेळी पोनि पाटील यांनी मला त्यांचे कारमध्ये बोलवुन घेेेेवुन माझे गळ्यातील डिजीटल व्हाईस रेकार्डर बंद करून आपले ताब्यात घेतला.त्यानंतर पोनि पाटील यांनी मला गाडीचे बाहेर थांबणेस सांगुन पंच तोडकर यांना गाडीमध्ये बोलवुन घेवुन त्यांचेकडे विचारपुस केली. त्यानंतर पंच तोडकर यांना बाहेर पाठवुन मला गाडीमध्ये बोलवुन घेवुन माझेकडे घडलेल्या घटनेबाबत विचारपुस केली. त्यावेळी मी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि पाटील यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर सुरू करून त्यामध्ये ध्वनीमुद्रीत झालेले माझे व सहाय्यक अभियंता घुले यांचे संभाषण ऐकले. त्यावेळी माझे व पंच नं. 1 तोडकर यांचे सांगणेवरून, तसेच डिजीटल व्हाईस रेकार्डर मधील ध्वनिमुद्रीत संभाषणावरून सहाय्यक अभियंता घुले यांनी तक्रारदार यांचेकडे राधाकृष्ण अपार्टमेंट मधील 14 फ्लट धारकांचे नवीन वीज जोडणीचे काम करून दिलेबद्दल बक्षीस म्हणुन 5,000/- रू. लाचेची मागणी करून ती लाच रक्कम उद्या-परवा, कधी पण देण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले. त्यानंतर दि. 28/11/2019 रोजी सायंकाळी 04.00 वा चे नंतर एम.एस.ई.बी. शाखा कार्यालय कोडोली येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरवुन पोनि पाटील यांनी मला दि. 28/11/2019 रोजी 04.00 वा चे नंतर कोडोली ते पोखले जाणारे रोडवर हाटेल गायत्रीचे अलीकडे येण्यास सांगुन तेथुन दोन्ही पंच व स्टाफसह त्यांचेकडील कारने कोल्हापूरकडे निघुन गेले होते. त्यानंतर ठरलेप्रमाणे दि. 28/11/2019 रोजी पोनि पाटील यांनी मला फोन करून कोडोली ते पोखले जाणारे रोडवर हाटेल गायत्रीचे अलीकडे येत असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे थोडयावेळाने मी माझे शेवरोलेट कारने जावुन तेथे जावुन भेटलो. त्यावेळी पोनि पाटील यांनी मला त्याचे कारमध्ये बोलवुन घेवुन, मला व पंचांना सापळापुर्व पंचनाम्याचे महत्व सांगुन सापळापुर्व पंचनामा सुरू केला. त्यामध्ये त्यांनी मला व पंचांना अल्ट्राव्हायोलेट दिवा व अन्थ्रासिन पावडरचे महत्व समजावून सांगितले. त्यानंतर मी सहाय्यक अभियंता घुले यांना देणेसाठी लाच रक्कम 5,000/- रूपये हजर केले. एका को-या कागदावर त्या नोटांचे नंबर लिहुन तो कागद पंच नं. 2 मंगसुळे यांचकडे देण्यात आला. त्यानंतर सफौ बुचडे यांनी कारमध्ये एका कागदावर नोटांचे दोन्ही बाजुस हाताचे बोटाने अन्थ्रासिन पावडर लावुन त्या नोटा माझ्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवल्या. त्यानंतर पोनि पाटील यांनी सापळा कारवाईबाबत मला, पंच व त्यांचेसोबतचे कर्मचारी यांना योग्य त्या सुचना देवुन डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड घालुन त्यामध्ये कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत झालेले नसलेची पंचांची खा्त्री करून दिली. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकार्डर माझ्या गळ्यात शर्टचे आतील बाजुस कोणास दिसणार नाही अशारितीने अडकवुन चालु केला व मला आणि पंच नं. 1 तोडकर यांचेसोबत एम.एस.ई.बी. शाखा कार्यालय कोडोली येथे सहाय्यक अभियंता घुले यांची भेट घेण्यासाठी माझे कारमधुन पाठविले व पोनि पाटील, पंच नं. 2 मंगसुळे व स्टाफ असे त्यांचेकडील गाडीने एम.एस.ई.बी. कार्यालयाकडे आले होते. एम.एस.ई.बी कार्यालयात गेलेवर मी घुले यांना भेटुन त्यांचेशी माझे कामाबाबत चर्चा केली. त्यानंतर आम्ही कार्यालयाचे बाहेर जावुन चहा घेतला व परत कार्यालयामध्ये आत गेलो. तेथे थोडावेळ चर्चा करून घुले व मी त्यांचे कार्यालयाबाहेर आलो. चालत चर्चा करत घुले यांचे मारूती कारजवळ गेलो, त्यावेळी घुले त्यांचे कारमध्ये बसले. त्यावेळी मी त्यांना देवु का असे म्हणले असता, सहाय्यक अभियंता घुले यांनी द्या असे म्हटले. त्यावेळी मी माझे शर्टच्या डाव्या खिशातुन उजव्या हाताने लाच रक्कम 5,000/- रूपये सहाय्यक अभियंता घुले यांचेसमोर धरून मोजुन घ्या असे म्हणलो असता, त्यांनी आपल्या उजव्या हाताने लाच रक्कम स्विकारली. त्यावेळी मी पोनि पाटील यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे माझा डावा हात डोक्यावरून फिरवुन सहाय्यक अभियंता घुले यांनी लाच रक्कम स्विकारलेचा इशारा केला. तेव्हा पोनि पाटील व त्यांचा स्टाफ आमचेकडे येत असताना घुले यांनी त्यांचे उजवे हातातील लाच रक्कम डाव्या हाताने त्यांचे कारचे दुस-या बाजुचे खिडकीतुन बाहेर टाकली. त्यावेळी पोनि पाटील व त्यांचे स्टाफने त्यांना पकडले व त्यानंतर पोनि पाटील यांनी माझे गळ्यातील डिजीटल व्हाईस रेकार्डर बंद करून ताब्यात घेतला. तसेच सहाय्यक अभियंता घुले यांनी स्विकारलेली लाच रक्कम रूपये 5,000/- पंच साक्षीदारांचे समक्ष जप्त करून ताब्यात घेतली. सदर कारवाईमध्ये सहाय्यक अभियंता घुले यांनी राधाकृष्ण अपार्टमेंट मधील 14 फ्लट धारकांचे नवीन वीज जोडणीचे काम करून दिलेबद्दल बक्षीस म्हणुन माझेकडे रूपये 5,000/- लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्विकारली असता त्यांना अन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडलेने त्यांचेविरूध्द माझी फिर्याद आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): SURAJ BABASAHEB BANSODE(I (Inspector)) / 12301003983SBBM **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
**Name**(नाव): SURAJ BABASAHEB BANSODE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 12301003983SBBM

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)